तपासी अधिकारी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** सातारा शहर  **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0753  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/08/2022 02:47 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 26/08/2022

**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/08/2022

**Time From (वेळेपासून):** 18:58 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:58 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date (दिनांक ):** 27/08/2022  **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No. (नोंद क्र.):** 006  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/08/2022 02:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** ईशान्य, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगर भूमापन अधिकारी कार्यालय, सातारा,सातारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजकुमार पंढरीनाथ ठेंगे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** पंढरीनाथ

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं 161,कष्णाकाटाचे पाठीमागे,जुनी एमआयडीसी, सातारा ,सातारा,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | काशिळ,सातारा,बोरगांव,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9850899527

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शामराव शंकर बांदल | | वडील का नाम : शंकर | 1. फ्लॅट एस 2,पुष्प जोतीबा अपार्टमेंट , रामकुंड सातारा,सातारा,सातारा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

विनाविलंब

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दि 27/8/2022मी.राजकुमार पंढरीनाथ ठेंगे वय 50 वर्षे,शिक्षण 8 वी पास,व्यवसाय-शेती, राहणार- मु.पो.काशिळ, ता.जि. सातारा सध्या राहणार प्लट नंबर 161, कृष्णाकाटाचे पाठिमागे, जुनी एमआयडीसी , सातारा ता.जि.सातारा मोबाईल नंबर 9850899527. समक्ष सातारा शहर पोलीस स्टेशन मध्ये हजर होवुन खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी राहणे असुन माझे मौजे काशिळ, ता. जि. सातारा येथिल सि. स नंबर 52 मध्ये एकुण 2 गुंठे क्षेत्र हे 1 तुकाराम भैरु ठेंगे 2. नवनाथ भैरु ठेंगे 3. मुगुटराव सिताराम ठेंगे 4. अजिंक्य पंढरीनाथ ठेंगे 5. सचिन पंढरीनाथ ठेंगे 6. सखुबाई पंढरीनाथ ठेंगे व मी असे आमचे एकुण 7 जणामध्ये वडिलोपार्जित क्षेत्र आहे.मी नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथिल कार्यालयामध्ये विनंती अर्ज देवुन मौजे काशिळ ता. जि.सातारा येथिल सि. स नंबर 52 मधील माझे व इतर सहा जणांमधील असलेले एकुण 2 गुंठे क्षेत्राची हद्दकायम मोजणी करणे बाबत अर्ज देवुन दिनांक 19/1/2021 रोजी नगर भुमापण अधिकारी कार्यालय सातारा येथिल आर.ए.भोसले यांनी मोजणी करून हद्द निश्चीती करून त्या प्रमाणे नकाशा तयार करून दिलेला आहे.तरी सदरची मोजणीचे नकाशामध्ये अतिक्रमणाची नोंद केली आहे.परंतु सदरचे अतिक्रमण कोणी केली आहे याबाबत नोंद घेण्यात आलेली नाही.त्यामुळे मी पुन्हा हद्द निश्चिती साठी नगरभुमापण अधिकारी कार्यालय सातारा येथे अर्ज देवुन त्○ा बाबतचे ऑनलाईनचे 3000 रूपये रक्कमेचे चलन भरून मौजे काशिळ ता.जि.सातारा येथिल सि.स नंबर 52 मधील माझे व इतर 6 जणांमध्ये असलेले एकुण 2 गुंठे क्षेत्राचे मोजणी मागुण घेतली होती. त्यानंतर मला सदर कार्यालयाचे दिनांक 5/5/2022 रोजीचे पत्रानुसार दिनांक 20/5/2022 रोजी मोजणी करणेबाबतची हद्दकायम मोजणीची नोटीस मला मिळाली. त्यानंतर दिनांक 20/5/2022 रोजी नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथिल आर. ए. भोसले हे प्रत्यक्ष मोजणीसाठी काशिळ येथे आले परंतु लगतदार असणारे लोकांनी सदर मोजणीवर आक्षेप घेतल्याने सदरची मोजणी ही मोजणी न करता परत माघारी गेली. त्यानंतर मी भोसले साहेब यांची भेट घेतली त्यावेळी त्यांनी मला दिनांक 19/1/2021 मध्ये केलेल्या मोजणीमधील नकाशामध्ये अ.क्रं 3 मधील अनिल महादेव ठेंगे - लगतदार यांनी केलेल्या अतिक्रमणाची नोंद घेवुन बांदल साहेब यांचेकडे देतो बांदल साहेब तुमचे काम करणार आहेत का ते बघा त्यासाठी तुम्ही प्रथम बांदल साहेब यांची भेट घेवुन चर्चा करणेस सांगितले. त्यानंतर मी मागील आठवड्यामध्ये बांदल साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला आमी तुमच ती अतिक्रमणाच करून टाकु , पण तुमी आमच चहापाण्याच लवकर बघुन टाका असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना नाईलाजास्तव होम्हणुन तेथुन निघुण आलो.तरी नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथिल बांदल साहेब हे माझे मौजे काशिळ येथिल असलेल्या जमिनीची दिनांक 19/1/2021 रोजी केलेल्या मोजणीच्या नकाशामध्ये अतिक्रमणाची नोंद घेणेसाठी बांदल साहेब यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेबाबत चर्चा करून ते मागणी करतील ती लाच रक्कम त्यांना नेवुन

देणार आहे. तरी नगर भुमापन अधिकारी अधिकारी कार्यालय सातारा येथिल बांदल साहेब यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत मी दिनांक 25/8/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो , सातारा कार्यालयात येवुन नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथिल बांदल साहेब हे लाच मागणी करत असल्याची लेखी तक्रार पोलीस निरीक्षक श्री.राऊत साहेब यांना दिली .त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी माझे तक्रारीप्रमाणे पडताळणी कारवाई करणेसाठी अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा कार्यालयात हजर असलेले जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय , सातारा कार्यालयातील 1. राजेश बापुसाहेब संपकाळ (लिपीक) 2. अस्लम बाबासो मुल्ला , कृषी सहाय्यक या दोन पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी दिलेली लेखी तक्रारी अर्ज श्री राऊत साहेब व दोन्ही पंचानी वाचुन पाहिला. त्यानंतर माझ्या तक्रारप्रमाणे नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथिल बांदल साहेब यांनी माझ्याकडे लाच मागणी केली अगर कसे याची पडताळणी करण्यासाठी पंच नं 1 म्हणुन संपकाळ व पंच नं 2 म्हणुन मुल्ला यांनी काम करण्याचे श्री.राऊत साहेबांनी ठरवुन दोन्ही पंचानी व श्री राऊत साहेबांनी माझ्या तक्रारी अर्जावर सह्या केल्या. त्यानंतर श्री राऊत साहेब यांनी मला व पंच नं 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डसह माझेकडील दुचाकी वाहणावरुन त्याचे सोबत नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथे भेट घेण्यासाठी पाठवुण पडताळणी केली असता त्यामध्ये बांदल साहेब यांची माझ्याशी समक्ष भेट झाली त्यावेळी माझे दिनांक 19/01/2021 रोजी मौजे काशिळ, ता.जि. सातारा येथील सि.स.नं. 52 मधील माझे व इतर सहा जणांमधील एकुण 02 गुंठेच्या नकाशामध्ये अतिक्रमणाबाबत सविस्तर चर्चा होवुन तशी दुरुस्ती करुन देणेबाबत चर्चा झाली. त्यावेळी बांदल साहेब यांनी त्यांचे समोरील कागदावर 5000/- रुपये मराठीमध्ये लिहुन माझे काम करुन देणेसाठी 5000/- रुपये रक्कमेची संदिग्ध स्वरुपाची लाच मागणी करत मला यांना द्यात मी काय बोलणार नाय, तुमची इच्छा काय असेल ते, तिकड राहुलपाशी द्या असे सांगितले असल्याने बांदल साहेब यांनी 5000/- रुपये लाच रक्कमेची मागणी कोणासाठी केली आहे व कोण घेणार आहे याबाबत झालेल्या संभाषणामध्ये स्पष्टता नसुन सदर 5000/- रुपये लाच रक्कमेबाबत राहुल म्हणजे नगर भुमापन अधिकारी सातारा कार्यालयातील भोसले साहेब यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानंतर द्वितीय पडताळणी कारवाईमध्ये माझ्या व पंच नं. 1 यांचे हकीकतीवरुन तसेच ध्वनीमुद्रीत संभाषणावरुन नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथील भोसले साहेब यांची समक्ष भेट झाली नाही. तसेच तेथील बांदल साहेब यांची यांचेशी समक्ष भेट होवुन मला दिनांक 26/08/2021 रोजी सकाळी येवुन भोसले साहेब यांची भेट घेण्यास सांगितले असुन सदर वेळी लाच मागणीबाबत काहीएक चर्चा झालेली नसल्याची श्री. राऊत साहेब व पंचांची खात्री झाली. श्री. राऊत पोलीस निरीक्षक यांनी दि. 25/08/2022 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करुन दि. 26/08/2022 रोजी पडताळणी व सापळा कारवाई करण्याचे ठरवुन मला दि. 26/08/2022 रोजी सकाळी 10.00 वाजता अँन्टी करप्शन, सातारा लाच रक्कमेसह हजर सांगितले व मी घरी निघुन गेलो. त्यानंतर आपले दिले सुचनेनुसार दिनांक 26/08/2022 रोजी सकाळी 10.00 वाजता अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे थांबुन राहिलो. त्यावेळी श्री. राऊत साहेब, त्यांचे सापळा पथकासह कार्यालयामध्ये हजर होते. त्याठिकाणी दिनांक 25/08/2022 रोजी पडताळणी कामी असलेले पंच नं. 1) राजेश बापुसाहेब संकपाळ, लिपीक 2) अस्लम बाबासो मुल्ला, कृषी सहाय्यक या दोन शासकीय पंचासह हजर होते त्यानंतर आपण त्यांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे मला पडताळणी कारवाईमध्ये माझ्या व पंच नं. 1 यांचे हकीकतीवरुन तसेच ध्वनीमुद्रीत संभाषणावरुन नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथील लोकसेवक भोसले साहेब व माझी समक्ष भेट झाली नसुन मी भोसले साहेब यांना फोन केला असता भोसले हे मोजणीकामी क्षेत्रमाहुली येथे गेले असुन तेथील काम झाल्यानंतर नागठाणेला जाणार व तेथुन परत येणार असल्याचे समजले. त्यानंतर माझी व लोकसेवक बांदल साहेब यांची भेट झाली त्यावेळी लोकसेवक बांदल साहेब यांनी भोसले येतील तेव्हा बघु असे सांगितले तसेच मी दुपारी येतो असे बांदल साहेब यांना सांगितले असल्याची श्री. राऊत साहेबांची व पंचांची खात्री झाली. त्यानंतर एकंदरीत मी लाच मागणी संदर्भात दिले तक्रारीनुसार केले पडताळणी कारवाईमध्ये मी व पंच यांचे हकीकतीवरुन तसेच ध्वनीमुद्रीत संभाषणावरुन नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथील लोकसेवक भोसले साहेब व माझी समक्ष भेट झाली नसुन मी भोसले साहेब यांना फोन केला असता भोसले साहेब यांनी माझे फोन उचलले नाहीत. तसेच लोकसेवक बांदल व माझी समक्ष भेट झाली त्यावेळी बांदल साहेब यांनी माझ्या दिनांक 19/01/2021 रोजी मौजे काशिळ, ता.जि. सातारा येथील सि.स.नं. 52 मधील माझ्या व इतर सहा जणांमधील एकुण 02 गुंठेच्या नकाशामध्ये अतिक्रमणाचे प्रकरण भोसले साहेब यांचेकडुन बांदल साहेब यांचेकडे आल्यानंतर बांदल साहेब यांनी सदरचे प्रकरण मंजुर करणेसाठी 5000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथे आणुन देण्यास सांगितल्याची श्री. राऊत साहेबांची व पंचांची खात्री झाली. त्यानंतर नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथील बांदल साहेब यांनी मागणी केलेल्या 5000/- लाच रक्कमेमध्ये भोसले साहेब यांचा सहभाग आहे काय याबाबत भोसले साहेब यांचेकडे पडताळणी कारवाई करणेचे ठरविले. त्यानंतर एकंदरीत मी लाच मागणी संदर्भात दिले तक्रारीनुसार केले पडताळणी कारवाईमध्ये पंच नं. 1 व माझे हकीकतीवरुन तसेच ध्वनीमुद्रीत संभाषणावरुन नगर भुमापन अधिकारी कार्यालय सातारा येथील लोकसेवक भोसले साहेब व माझी यांची समक्ष भेट झाली. त्यावेळी भोसले साहेब यांनी माझे दिनांक 19/01/2021 रोजी मौजे काशिळ, ता.जि. सातारा येथील सि.स.नं. 52 मधील माझे व इतर सहा जणांमधील एकुण 02 गुंठेच्या नकाशामध्ये अतिक्रमाणाबाबत सविस्तर चर्चा होवुन नकाशामध्ये बदल सदरचे प्रकरण दिनांक 29/08/2022 रोजी बांदल साहेब यांचेकडे देत असलेचे सांगितले असून लाच रकमेबाबत चर्चा झाली. परंतु भोसले यांनी लाच रक्कम मागणी केले नसलेचे श्री राऊत साहेब व पंचांची खात्री झाली. त्यानंतर बांदल साहेब यांनी मागणी केलेली 5,000/- लाच रक्कम सापळा कारवाई करणेचे ठरवून बांदल साहेब यांना देणेचे ठरविले. त्यानंतर श्री राऊत साहेब यांचे सुचनेनुसार मी 5,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहून ठेवून त्या लाच रकमेस अँथ्रासिन पावडर लावणेबाबतची कारवाई अँटी करप्शन ब्युरो सातारा कार्यालयात केली. सापळा कारवाई संबंधाने श्री राऊत साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकार्डर देऊन पंच नं. 1 यांना माझ्यासोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन बांदल साहेब यांची भेट घेणेकामी नगरभूमापन अधिकारी कार्यालय सातारा येथे रवाना केले. मी व पंच नं. 1 संकपाळ असे दोघेजण नगरभूमापन अधिकारी कार्यालय सातारा येथे गेलो. तेथे मी वाहन सातारा तहसिल कार्यालयाचे आवारात घेऊन नगरभूमापन अधिकारी कार्यालय सातारा असा बोर्ड लिहलेल्या इमारतीसमोर पार्क केले. मी व पंच नं. 1 असे नगरभूमापन अधिकारी कार्यालय सातारा असा बोर्ड लिहलेल्या इमारतीमध्ये गेलो. त्यावेळी संगणक कक्ष असे लिहलेल्या दरवाजातून आत जाऊन बांदल साहेबा बरोबर चर्चा करु लागलो. पंच नं. 1 हे केबिनचे बाहेरील बाजूस दरवाजाचे जवळ थांबून आमच्यातील चर्चा ऐकत थांबून राहिले. त्यावेळी मी बांदल साहेब यांना, नमस्ते साहेब, भेटला राहूल मगाशी असा म्हणालो. त्यावर बांदल साहेब काय म्हणाले असे विचारताच मी, काय ते म्हणलं ती सोमवार पर्यंत तयार करुन देतो, तुमच्याकडे देतो नाहीतर मी त्यांचेकडे देतो,घ्या तुम्ही असे म्हणालो. त्यावर मी व बांदल साहेबामध्ये माझ्या कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी बांदल साहेब यांना, देऊ का आणल्यात तेवढं पाचअसे म्हणालो. त्यावर बांदल साहेब यांनी नको आता काय, राहुल आहे का खाली असे विचारले. त्यावर मी, खर्चून जातीली म्हणून काय आज तरी द्यायचे, उद्या तरी द्यायचे असे म्हणालो. त्यावर बांदल साहेबांनी,त्यांचा उजवा हात पुढे करुन माझ्याकडे लाच मागणीचा इशारा केला. त्यावेळी मी माझे शर्टचे डावे बाजूचे खिशातून अंथ्रासिन पावडर लावून ठेवलेले 5,000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढून बांदल साहेब यांचे समोर धरले. त्यावेळी बांदल साहेब यांनी ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन लाच रकमेवर नजर फिरवून त्यांचे शर्टचे डावे बाजूचे खिशात ठेवत बरं बरं चालतय असे म्हणाले. त्यानंतर मी

बांदल साहेबांचे केबिनचे बाहेर आलो व लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्यासाठी मी 18.58 वाजणेच्या सुमारास माझ्या डोक्यावरुन दोन वेळा डावा हात फिरवून लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. तो इशारा पाहून श्री राऊत साहेब, पंच नं. 2, सातारा पथक असे सर्वजण माझ्याजवळ आले व श्री राऊत साहेब यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्ड काढून घेऊन तो बंद केला व मला बाजूस थांबण्यास सांगितले.

काहीवेळाने श्री राऊत साहेबांनी मला कार्यालयात बोलावून माझी अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पे-यांस व तळहातास तसेच माझ्या शर्टच्या छातीवरील खिशाचे आतील बाजूस व कंडास अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर श्री राऊत साहेब यांनी मला कळविले की, श्री बांदल यांना ताब्यात घेऊन त्यांची कार्यालयातच तपासणी केली. त्यावेळी श्री बांदल यांचे अंगावरील शर्टचे डाव्या बाजूचे खिशाचे आतील बाजूस व कंडास तसेच त्यांचे दोन्ही हाताचे बोटांचे पे-यास व तळहातास अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर श्री राऊत यांनी श्री बांदल यांना ताब्यात घेऊन सर्व पथकासह शासकीय वाहनाने तसेच मी व पंच नं 1 सोबतच्या वाहनाने अँटी करप्शन ब्युरो सातारा येथे दाखल झालो. त्यावेळी राऊत साहेबांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काहीवेळाने श्री राऊत साहेब यांनी मला कार्यालयात बोलवून घेऊन पंचासमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यानंतर राऊत साहेबांनी, माझे व पंच नं. 1 संकपाळ याचे सांगणेप्रमाण संभाषणाचे स्क्रिप्टमधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा कार्यालयामध्ये बोलावून घेऊन मला हकीकत विचारली त्यावेळी मी पंच नं. 1 यांचे प्रमाणे हकीकत सांगितली. सदर बाबत सविस्तर यशस्वी पंचनामा अँटी करप्शन ब्युरो सातारा येथे टंकलिखित करुन पुर्ण करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेवक शामराव शंकर बांदल, वय 52 वर्षे, पद- प्रमुख लिपिक, नगरभूमापन अधिकारी कार्यालय सातारा वर्ग तीन, सध्या रा. रामकुंड पुष्प जोतीबा अपार्टमेंट, फ्लॅट एस 2, सातारा मूळ रा. मु.पो. बिबवी ता. जावली जि. सातारा यांनी दिनांक 25/08/2022 व दिनांक 26/08/2022 रोजीचे पडताळणी कारवाई वेळी माझ्याकडे, माझे दिनांक 19/01/2021 रोजी मौजे काशिळ ता. जि सातारा येथील सि. स. नं. 52 मधील माझे व इतर सहा जणांमध्ये एकूण दोन गुंठेच्या नकाशामध्ये अतिक्रमणाचे प्रकरण भोसले साहेब यांचेकडून बांदल साहेब यांचेकडे आलेनंतर बांदल साहेब यांनी सदरचे प्रकरण मंजूर करणेसाठी 5,000/- रुपयांची मागणी करुन ती दिनांक 26/08/2022 रोजी 5,000/- लाच रक्कम नगर भूमापन अधिकारी सातारा कार्यालयात 18.58 वाजता स्विकारली आहे. म्हणून माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

माझा वरील खबरी जबाब माझ्या सांगणेप्रमाणे टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहिला असून बरोबर आहे.

समक्ष ही खबर दिला.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम/ हाती घेतले):** BAGHWAN BABANRAO NIMBALKAR(I (Inspector)) DGPBBNH6502 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** BAGHWAN BABANRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPBBNH6502

(जे.डी.पवार)
पोना 2239
मो.नं. 8605002051
पा. स्टे. ऑफिसर
सातारा शहर पो. स्टे